CNR No.MHST120007862026

## आदेश निशाणी क्र.५ खाली

(ता. २२/०६/२०२६ रोजी पारित केला)

वादीने सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९, नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादी विरुध्द वादमिळकती बाबत तात्पुरता मनाई हुकूम मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

२. वादीने सदर अर्जात असे कथन केले आहे की, मौजे काळचौंडी ता. माण जि. सातारा येथील शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र हे. आर. | आकार रु.पैसे | हिस्सा / क्षेत्र हे. आ |
|---|---|---|---|---|
| १ | ३८ | ला. ला. ०० हे. १२.०० | ००= ४७ | ला.ला. ००.०६.०० |
| | | पो.ख. ०० हे. ००.०० | | पो.ख. ००.००.०० |
| २ | १७२ | ला. ला. ०१ हे. १७.०० | ००= ७५ | ला.ला. ००.९३.८४ |
| | | पो.ख. ०० हे. ३०.०० | | पो.ख. ००.२४.०६ |
| ३ | ३२७ | ला. ला. ०० हे. ३०.०० | ००= १९ | ला.ला. ००.२४.०६ |
| | | पो.ख. ०० हे. ०२.०० | | पो.ख. ००.०१.६१ |
| ४ | ३४०/१ | ला. ला. १० हे. ३९.०० | ००= ९३ | ला.ला. ०१.१०.७६ |
| | | पो.ख. ०० हे. ३०.०० | | पो.ख. ००.२३.९० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | ३४०/२ | ला. ला. ०० हे. ३७.०० | ००= १९ | ला.ला. ००.२९.६८ |
| | | पो.ख. ०० हे. ०५.०० | | पो.ख. ००.०४.०० |
| ६ | ३४३ | ला. ला. ०० हे. १०.०० | ००= ०६ | ला.ला. ००.०४.०१ |
| | | पो.ख. ०० हे. ०९.०० | | पो.ख. ००.०३.६१ |
| ७ | ३४९ | ला. ला. ०० हे. ५१.०० | ००= २२ | ला.ला. ००.४०.९१ |
| | | पो.ख. ०० हे. १५.०० | | पो.ख. ००.१२.०३ |
| ८ | ४०७ | ला. ला. ०० हे. ८१.०० | ०१= १९ | ला.ला. ००.६४.९७ |
| | | पो.ख. ०० हे. ०७.०० | | पो.ख. ००.०५.६१ |
| ९ | ७९४ | ला. ला. ०० हे. ८३.०० | ००= २५ | ला.ला. ००.६६.५७ |
| | | पो.ख. ०० हे. ०९.०० | | पो.ख. ००.०७.२२ |
| १० | ६४५ | ला. ला. ०२ हे. ७२.०० | ०२= २५ | ला.ला. ०१.७४.२५ |
| | | पो.ख. ०० हे. ०८.०० | | पो.ख. ००.०५.१३ |
| ११ | ४१० | ला. ला. ०० हे. १७.०० | ००= ०६ | ला.ला. ००.१२.५८ |
| | | पो.ख. ०० हे. ११.०० | | पो.ख. ००.०८.१३ |
| १२ | ४०९ | ला. ला. ०० हे. ०२.०० | ००= ०३ | ला.ला. ००.००.८१ |
| | | पो.ख. ०० हे. ०३.०० | | पो.ख. ००.०१.२० |
| १३ | ३४५ | ला. ला. ०० हे. १९.०० | ००= ०६ | ला.ला. ००.०५.७४ |
| | | पो.ख. ०० हे. ०३.०० | | पो.ख. ००.००.९१ |
| १४ | ३५० | ला. ला. ०० हे. २३.०० | ००= ०९ | ला.ला. ००.०९.२२ |
| | | पो.ख. ०० हे. ३८.०० | | पो.ख. ००.१५.२४ |

येणे प्रमाणे शेतजमीन मिळकती असून त्यामधील विहिर, इले. मोटर, पाईप लाईन, पाळी प्रमाणे पाणी घेणेचे हक्कासह व त्यामधील झाड झुडूप, दगड माती, तदंगभूत वस्तू हा या दाव्याचा वाद विषय आहे.

३. वादीने पुढे असे कथन केले आहे की, दावा कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकती हया वादी, प्रतिवादी यांच्या वडिलार्जीत मालकी हक्क, कब्जे वहिवाटीच्या आहेत. दावा मिळकतीमध्ये वादीचा कायदेशीररित्या १/६ हिस्सा होता व आहे. दावा मिळकतीत वादीची समाईकात कब्जे वहिवाट होती व आहे. सदरील वादी हा प्रतिवादी यांच्या बरोबर समाईकात वहिवाट करुन दरसाल पिके करुन उत्पन्न घेत आलेला होता व आहे. अशा प्रकारे दावा मिळकतीचे आज आखेर लेखी अथवा तोंडी वाटप वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. असे असताना वादीचे दावा मिळकतीमधील समाईकातील चालू शांततामय कब्जे वहिवाटीस प्रतिवादी यांनी हरकत अडथळा करुन वादीस दावा मिळकतीमधून हुसकावून लावण्याची भाषा केली. म्हणून वादीने प्रतिवादी यांना दि. १६/०२/२०२६ रोजी दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप करुन पृथक कब्जा मागणी केली असता प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दावा मिळकतीत तुझा काहीएक हक्क, हितसंबंध नाही, तुला जमीन वाटप करुन देणार नाही, तडजोड हुकूमनाम्याप्रमाणे दप्तरी ७/१२ रेकॉर्ड सदरी नोंदी झालेल्या असून त्या नोंदीचे आधारे आम्ही संपुर्ण शेतजमीन विक्री करुन टाकणार आहे. असे म्हणून वाटप करुन देणेस नकार दिला. त्यानंतर वादीने दावा मिळकतीचे ७/१२ चे उतारे काढून पाहिले असता असे दिसून आले की, दावा मिळकती अ. नं. १ ते १४ बाबत प्रतिवादी यांनी एकत्रित संगनमत करुन मे. कोर्टाची दिशाभूल करुन दावा मिळकतीबाबत रे. दि. मु. नं. ३३६/२०२४ चा दावा यातील प्रतिवादी क्र. ५ ने दाखल करुन त्या दाव्यामध्ये वादीस आवश्यक पक्षकार न करता व वंशावळीमध्ये त्याचे नाव न दखवता व मयत ईश्वर यास वादीस वारस न दाखवता प्रतिवादी यांनी वादीचे अपरोक्ष दावा मिळकतीबाबत तडजोड तयार करुन वादीचे गैरहजेरीत तडजोड अस्तित्वात आणून खोटी वंशावळ दर्शवून सदरची तडजोड ता. १४/१२/२०२४ रोजी मे. कोर्टाची दिशाभूल करुन तडजोड केलेचे दिसून येत आहे व त्या तडजोड नुसार दावा मिळकत अ. नं. १ ते १८ चे ७/१२ रेकॉर्ड सदरी प्रतिवादी यांनी फेरफार नं. २१५५ अन्वये दि.

१६/१०/२०२५ रोजी नोंदी करुन घेतलेल्या आहेत. त्या नोंदीची नोटीस वादीस नव्हती व नाही. याबाबतची संपूर्ण माहिती त्याबाबत सर्व कागदपत्र काढलेनंतर समजली आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी अस्तित्वात आणलेली तडजोड ही बेकायदेशीर असून वादीचे हिश्यावर बंधनकारक नाही. म्हणून वादीस सदरचा दावा दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होऊन वादीचे १/६ हिश्याचे अलक व तृटक होऊन मिळणेसाठी व रे. दि. मु. नं. ३३/२०२४ मधील तडजोड हि वादीचे हिश्यावर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

४. वादीने पुढे असे कथन केले आहे की, सदरील प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी आपसात संगनमत करुन दावा मिळकती बाबत मे. कोर्टाची दिशाभूल करुन वादीचे अपरोक्ष प्रतिवादी यांनी दावा मिळकतीबाबत रे. दि. मु. नं. ३३६/२०२४ या दाव्यामध्ये वादीचे अपरोक्ष तडजोड करुन तडजोड हुकूमनामा अस्तित्वात आणलेला आहे. वादीचा दावा मिळकतीमधील हक्क डावलणेसाठी प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी दावा मिळकतीचे हस्तांतरण करणेची भाषा केलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी दावा मिळकतीचे हस्तांतरण केलेस प्रस्तुत दाव्यामधील दावा मिळकतीमधील वादीचे कायदेशीर हिश्यावर गदा येवून वादीचे कधीही कशानेही न भरुन येणारे फार मोठया प्रमाणावर नुकसान होणार आहे. ते टाळणेसाठी प्रस्तुत दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी दावा मिळकतीचे हस्तांतरण होईल असे गहाण, दान, लिज, बक्षीस, विक्री इत्यादी कोणत्याही प्रकारचे कृत्य करु नये. तसेच वादीस दावा मिळकतीमधून हुसकावून लावू नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादी नं. १ ते ४ यांचे विरुध्द देण्यात यावी. सदर प्रतिवादी यांचेविरुध्द तुर्तातुर्त ताकीद दिलेस प्रतिवादीचे काहीएक नुकसान होणार नाही. उलट प्रतिवादी यांचेविरुध्द तुर्तातुर्त ताकीद न दिलेस वादीस दावा मिळकतीमधील कायदेशीर हक्कास मुकावे लागणार आहे. तसेच प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागण्यास

बराच कालावधी लागणार आहे. तसेच न्यायाचा तराजू वादीचे बाजुने आहे. तरी न्यायाचे व कायद्याचे दृष्टीने प्रतिवादीचे विरुध्द तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी अशी विनंती त्यांनी केली आहे.

**५.** प्रतिवादीने सदर अर्जास नि.क्र.१७ प्रमाणे म्हणणे दिले असून वादीचा अर्ज खोटा लबाडीचा असून त्यांना मान्य कबुल नसल्याचे कथन करुन अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती करुन असे कथन केले आहे की, वादी हा मयत ईश्वर सखाराम माने यांचा मुलगा नाही अगर कायदेशीर वारस नाही. वादीची वंशावळ चुकीची असून वादी हा मयत ईश्वर यांचा मुलगा नसल्याने त्यास दावा मिळकतीत कोणताही कायदेशीर हिस्सा प्राप्त होत नाही. वादीचे दाव्यास आवश्यक पक्षकार सामील न केल्याचे तत्वाची बाधा येते. सबब सदरचा अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

६. निशाणी क्र.५ वरील अर्ज व त्यावरील लेखी म्हणणे वाचले. दाखल कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. वादीकरीता विधिज्ञ श्री.ए.के.वाघमोडे व प्रतिवादी करीता विधिज्ञ श्री.एस.एस.कदम यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाच्या अवलोकनावरुन व दाखल युक्तिवादावरुन सदर अर्जाच्या निर्णयाकामी माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात. त्या मुद्दयांवरील माझे निष्कर्ष खालील कारणांकरीता प्रत्येक मुद्दयाचे समोर लिहिलेले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | वादीचे लाभात प्रथमदर्शनी संयुक्तिक बाजू आहे काय ? | .. | होकारार्थी |
| २. | न्यायाची तौलनिक बाजू वादीचे लाभात आहे काय ? | .. | होकारार्थी |
| ३. | मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल काय ? | .. | होकारार्थी |

४. काय आदेश ? .. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

## कारणमिमांसा

**७.** वादीने आपल्या कथनांच्या पृष्ठयर्थ नि.क्र.३ सोबत मौजे काळचौंडी ता. माण येथील दावा मिळकत गट नं. ३८, १७२, ३२७, ३४०/१, ३४०/२, ३४३, ३४९, ४०७, ७९४, ६४५, ४१०, ४०९, ३४५, ३५० इत्यादींचे ७/१२ उतारे तसेच फे.नं. २१५५ चा उतारा, म्हसवड दिवाणी न्यायालयातील रे. दि. मु. नं. ३३६/२०२४ मधील नि. १ ची सर्टीफाईड प्रत, म्हसवड दिवाणी न्यायालयातील रे. दि. मु. नं. ३३६/२०२४ मधील नि. २१ ची सर्टीफाईड प्रत, म्हसवड दिवाणी न्यायालयातील रे. दि. मु. नं. ३३६/२०२४ मधील नि. २२ ची सर्टीफाईड प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत. तसेच प्रतिवादी यांनी नि. २३ वर सुदाम ईश्वर माने यांचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्राची व्हेरीफाईड प्रत, सुदाम ईश्वर माने यांचे आधारकार्डची व्हेरीफाईड प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

**<u>मुद्दे क्र. १ ते ४ करीता :-</u>**

**८.** वादीने सदरचा अर्ज हा प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वादीचे दावा मिळकतीतील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये व दावा मिळकतीचे हस्तांतरण करु नये अथवा वादी दावा मिळकतीतील हुसकावले जाईल असे कृत्य करु नये यासाठी प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना तुर्तातुर्त ताकीद देण्याकामी दाखल केलेला आहे.

**९.** वादीचे कथन आहे की, तो मयत ईश्वर याचा मुलगा आहे व दाव्यातील वंशावळीप्रमाणे पाहिले असता असे दिसून येते की, वादीस विठोबा नावाचा एक भाउ होता व त्याचे वारस प्रतिवादी क्र. १ ते ४ हे आहेत. वादीने सदरकामी दावा मिळकतीचे दि. १६/१०/२०२५ रोजीचे ७/१२ उतारे दाखल केले आहेत. सदर दावा मिळकतीचे उतारे

पाहिले असता, प्रथमदर्शनी वादी अथवा वादीचे वडील ईश्वर माने यांचे नाव दिसून येत नाही. याउलट, सदर ७/१२ सदरी विठोबा ईश्वर माने यांचे नावे पुर्वी नोंद असलेले क्षेत्र दिसून येते व तदनंतर फेरफार क्र. २१५५ अन्वये प्रतिवादी क्र. १ ते ४ व इतर प्रतिवादी यांचे नावे नोंद दिसून येते. फेरफार क्र. २१५५ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, रे. दि. मु. नं. ३३६/२०२४ मधील नि. २१ वरील तडजोड पुरशीस नुसार सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.५ नानासो नामदेव माने यांचेमध्ये व सदर दाव्यातील इतर प्रतिवादी यांचेमध्ये दावा मिळकतीबाबत तडजोड होवून वाटप करण्यात आले आहे व सदरचे वाटप हे फेरफार क्र. २१५५ ने नोंदविण्यात आलेले आहे. रे. दि. मु. नं. ३३६/२०२४ वरील नि.१ चे अवलोकनावरुन असे दिसून येते की, यातील वादीने दाव्यातील परीच्छेद क्र. २ मध्ये वंशावळ दिलेली आहे. त्या वंशावळीमध्ये मयत ईश्वर यास केवळ विठोबा हा एकच मुलगा दाखविलेला आहे. सदर वंशावळीमध्ये वादीचे नाव कोठेही दिसून येत नाही. तथापी, वादीने दाखल केलेल्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावरुन प्रथमदर्शनी वादी हा मयत ईश्वर माने याचा मुलगा असल्याचे दिसून येते.

१०. फेरफार क्र. १६८ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, रामू सखाराम माने यांनी दिलेल्या अर्जावरुन त्यांच्यामध्ये तसेच तुळशीराम भानुदास माने तसेच पुतण्या महादेव आत्माराम माने, विठोबा ईश्वर माने नामदेव सखाराम माने अशी नावे दावा मिळकत गट नं. १७२, ३२७, ३४०/अ, ३४०/ब, ३४९, ४१७, ४१०, ६४५, ३४३, ३५० व ४०९ यास दाखल होणेकामी अर्ज दिला होता व त्याची नोंद प्रमाणित करण्यात आलेली आहे. यावरुन प्रथमदर्शनी हे स्पष्ट होते की, दावा मिळकतीस वादीचे नावाची नोंद नव्हती तर विठोबा ईश्वर माने केवळ त्याची नोंद होती, असे असले तरी प्रतिवादीने त्यांच्या कैफियतीमध्ये अथवा म्हणण्यामध्ये कोठेही दावा मिळकत वडीलार्जीत मिळकत नव्हती असे कथन केलेले नाही तर प्रतिवादीचे कथनानुसार वादी हा मयत ईश्वर याचा मुलगा नाही. तथापी, वादीने तो मयत ईश्वर याचा मुलगा असल्याचे व दावा मिळकत ही त्याची वडीलार्जीत मिळकत असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केले

आहे.

**११.** फेरफार क्र. १६८ वरुन प्रथमदर्शनी स्पष्ट होते की, रामु सखाराम माने याने एकत्र कुटूंबकर्ता म्हणून दावा मिळकतीचे वाटप करुन त्यामध्ये मयत ईश्वर याचा मुलगा विठोबा यास हिस्सा दिलेला होता. प्रतिवादी त्याचे कैफियतीमध्ये अथवा म्हणण्यामध्ये केवळ वादी हा मयत ईश्वर याचा मुलगा नसल्याचे नाकारत आहे व केवळ दावा मिळकतीस विठोबा ईश्वर माने याचे नाव फेरफार क्र. १६८ नुसार बराच काळ आहे व वादीने तो फेरफार वादातीत केलेला नाही असे कथन करत आहे. त्यामुळे वादीने फेरफार क्र. १६८ हा वादातीत केला आहे अथवा नाही तसेच वादीस फेरफार क्र. १६८ नुसार कोणते हक्क प्राप्त झाले याबाबत सविस्तर पुरावा येणे आवश्यक आहे. सद्यस्थितीमध्ये प्रथमदर्शनी दावा मिळकत ही वडीलार्जीत मिळकत असलयाचे दिसून येते. तसेच प्रतिवादीने रे. दि. मु. नं. ३३६/२०२४ मध्ये सदर वादीस वंशावळीमध्ये न घेता त्याचे अपरोक्ष तडजोड हुकुमनामा केल्याचे दिसून येत आहे. वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन वादी हा मयत ईश्वर याचा मुलगा आहे ही बाब प्रथमदर्शनी स्पष्ट होते. दावा मिळकत ही वडीलार्जीत असल्याचे देखील प्रथमदर्शनी स्पष्ट होत असल्याने वादीस दावा मिळकतीमधून प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी हुसकावून लावू नये अथवा त्याचे दावा मिळकतीतील वहिवाटीस हरकत अडथळा करु नये अशी ताकीद दिल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दावा मिळकतीचे ति–हाईत इसमांस हस्तांतरण केल्यास वादीचे अपरीमीत नुकसान होईल. न्यायाचा तराजू वादीचे बाजूने आहे. सबब, मुद्दा क्र. १ ते ३ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा नि.५ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी सदर दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो मौजे काळचौंडी, ता.माण, जि.सातारा दावा मिळकतीतील वादीचे कब्जेवहिवाटीस

स्वतः अगर इतरांमार्फत हरकत अडथळा करु नये, वादी दावा मिळकतीतून हुसकावला जाईल असे कृत्य करु नये तसेच दावा मिळकतीचे ति–हाईत इसमांस हस्तांतरण, विक्री करु नये अशी तुर्तातूर्त ताकीद देणेत येते.

३. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात यावा.

SHEETAL SHIVAJI SALUNKHE
Digitally signed by SHEETAL SHIVAJI SALUNKHE
Date: 2026.06.22 16:25:40 +0530

तारीख २२/०६/२०२६
म्हसवड

(एस.एस.साळुंखे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, म्हसवड
ता. माण जि. सातारा.